मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# जनता लयं अवघड, विचार करून मतदान करते

## पिंपरीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जोरदार शक्ती प्रदर्शन : जयंत पाटील

**पिंपरी ।**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।** राष्ट्रवादी पक्षातून गेलेल्यांची चिंता करण्यापेक्षा सोबत असलेल्या कार्यकर्त्यांचे योग्य संघटन करून पुन्हा नव्या जोमाने काम करत पक्षाची मजबूत बांधणी करायची आहे. तसेच पिंपरी चिंचवड शहरांमध्ये ज्या सुधारणा झाल्या त्यामध्ये शरद पवारांचा मोलाचा वाटा आहे. महाराष्ट्रातील जनता लय अवघड आहे, लोक विचार करून मतदान करतात. येत्या निवडणुकीत जनता महायुतीला धूळ चारल्याशिवाय राहणार नाही, असे परखड मत राष्ट्रवादी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी व्यक्त केले. पिंपरी चिंचवड शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहर कार्यालयाचे उद्घाटन जयंत पाटील यांच्या हस्ते शनिवारी



(२ डिसेंबर) करण्यात आले. तसेच यावेळी कार्यकर्ता मेळाव्यात जयंत पाटील यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले. यावेळी माजी आमदार आणि राष्ट्रीय सचिव पदी नियुक्त झालेले ॲड. जयदेव गायकवाड, ज्येष्ठ नेते आझमभाई पानसरे, शहराध्यक्ष तुषार कामठे, माजी महापौर सुमनताई पवळे, माजी नगरसेविका सुलक्षणा शीलवंत – धर, पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, माजी नगरसेवक गणेश भोंडवे, मीना नानेकर, शकुंतला भाट, स्मिता कुलकर्णी, मधुकर चिंचवडे, प्रदेश युवक अध्यक्ष महेबूब शेख, ज्येष्ठ नेते श्याम वाल्हेकर, प्रकाश म्हस्के, निहाल पानसरे, ज्योती निंबाळकर, इम्रान शेख, ज्येष्ठ नेते देवेंद्र तायडे, शिरीष जाधव आदी उपस्थित होते. यावेळी पिंपरी चिंचवड शहर राष्ट्रवादी काँग्रेसची जंबो कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. छत्रपती शाहू, फुले, आंबेडकरांचे समाजकारण म्हणजे बहुजन समाजाला प्रगतीकडे घेऊन जाणे आणि हेच कार्य राजकीय सामाजिक भावनेतून शरद पवार करत आहेत. जे सोडून गेले त्यांना स्पष्टीकरण द्यावे लागत आहे. परंतु जनतेबरोबर राहिले तर सत्ता सत्ता येते. शरद पवारांनी दहा वेळा अशी किमया करून दाखवलेली आहे. राज्याची विस्कटलेली घडी पवार साहेबच पुर्ववत करू शकतात, असा विश्वास जनतेला आहे. म्हणूनच जनता शरद पवारांच्या मागे ठामपणे उभी असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. लवकरच निवडणुका होत असून नवा डाव सुरू होत आहे. कारण पूर्वीची मुदत आता संपलेली आहे. येत्या काळात महापालिका तसेच राज्यात राष्ट्रवादीची पर्यायाने महाविकास आघाडीची सत्ता येईल, असा विश्वास जयंत पाटील यांनी व्यक्त केला. खासदार डॉ. अमोल कोल्हे म्हणाले की, रस्ते मोठे केले म्हणजे विकास होत नाही. विविध कंपन्या, माहिती तंत्रज्ञाननगरी आणत शहराच्या अर्थकारणाला शरद पवार यांनी चालना दिली. सत्ताधाऱ्यांनो नदी सुधार प्रकल्पाचे काय झाले. इंद्रायणीमाईवर फेसाचा तवंग येत आहे.

### सर्वसामान्य नागरिकांना मदत

**» स्वागत प्रास्ताविक करताना तुषार कामठे म्हणाले की, पिंपरीत नवीन सुरू झालेल्या पक्ष कार्यालय मध्ये ई सुविधा केंद्रद्वारे शहरातील सर्वसामान्य नागरिकांना मदत केली जाईल. येथे महिला व युवतींसाठी स्वतंत्र कक्ष असून याद्यावत कार्यालयात भविष्यात नागरिकांना कोणते कामानिमित्त हेलपाटे मारावे लागणार नाहीत. शहराचे ज्येष्ठ नेते आझमभाई पानसरे आज पवार साहेबांबरोबर आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली आगामी निवडणुका महापालिकेवर राष्ट्रवादीचा झेंडा फडकणार असा विश्वास तुषार कामठे यांनी व्यक्त केला. आभार सुलक्षणा शीलवंत – धर यांनी मानले. यावेळी ॲड. जयदेव गायकवाड, प्रशांत जगताप, महेबुब शेख यांनी मनोगत व्यक्त केले.**

# दिव्यांग मतदारांच्या नोंदणीसाठी चिंचवडमध्ये आज विशेष मोहिम

## जास्तीत जास्त पात्र दिव्यांग नागरिकांनी नोंदणी करावी

**मोशी**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।** निवडणूक आयोगाच्या सुचनेनुसार यापूर्वी मतदारापासून वंचित राहिलेल्या दिव्यांग मतदारांसाठी चिंचवडमध्ये रविवारी (दि.३) रोजी मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती २०५ चिंचवड विधानसभा मतदार संघाचे मतदार नोंदणी अधिकारी तथा कर आकारणी व कर संकलन विभागाचे सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी दिली आहे. या



मोहिमेचा जास्तीत -जास्त दिव्यांग नागरिकांनी लाभ घेऊन नोंदणी करावी, असे आवाहनही देशमुख यांनी केले आहे. चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात सकाळी रविवारी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत दिव्यांग मतदारांसाठी भारत निवडणूक आयोगामार्फत दि. १ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत मतदानापासून वंचित राहिलेल्या दिव्यांग बांधवांचे नाव मतदार यादीत समाविष्ट करण्यात येणार आहे. (फॉर्म नं ६ ) नवीन मतदार नोंदणी करीता (फॉर्म नं ६अ ) परदेशी मतदार म्हणून नोंदणी करीता (फॉर्म नं ६ब) विद्यमान मतदारांव्दारे आधार क्रमांकाची माहिती

(फॉर्म नं ७ ) आक्षेप आणि स्वत: हटवणे (फॉर्म नं ८ ) दुरुस्ती/ शिफ्टिंग / डुप्लिकेट एझखउ तसेच दिव्यांग व्यक्ती म्हणून चिन्हांकित करण्यासाठी अर्ज करावेत. फॉर्म जमा करताना दिव्यांग प्रमाणपत्र व रहिवाशी पुरावे जोडणे आवश्यक आहे. (फॉर्म नंबर ६ व ८ साठी – रहिवासी पुरावा, पत्याचा पुरावा लाईट बिल/पाणी पट्टी, आधार कार्ड, बँकेचे किंवा पोस्टाचे पास बुक, भारतीय पारपत्र, नोंदणीकृत विक्रीखत, नोंदणीकृत भाडेकरार वयाचा पुरावा जन्म प्रमाणपत्र, आधारकार्ड, राज्यशिक्षण मंडळाने निर्गमित केलेले १० वी किंवा १२ वी चे प्रमाणपत्र. फॉर्म नंबर ७ साठी नाव वगळावयाचे व्यक्तीचा मृत्यु दाखला, लाईट बिल/पाणी पट्टी, आधारकार्ड, बँक किंवा पोस्टाचे पास बुक, भारतीय पारपत्र, नोंदणीकृत विक्रीखत, नोंदणीकृत भाडेकरार द्यावा लागणार आहे.

# क्रीडांगणाचा निर्णय होईपर्यंत साखळी उपोषण!

## विरोधत निर्णय घेतल्यास पुन्हा अमरण उपोषण-रूपाली आल्हाट

**मोशी । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** परिसरातील रिव्हर सोसायटीसमोरील क्रीडांगणाबाबत सोमवारी साडेदहा वाजता बैठक घेऊन तोडगा काढण्याबाबत आयुक्तांनी प्राथमिक पत्र दिले आहे. त्यामुळे अमरण उपोषणाऐवजी साखळी उपोषण सुरु आहे. सोमवारी(दि.४) हॉर्स रायडिंगचा निर्णय



मागे न घेतल्यास पुन्हा अमरण उपोषण करू असा इशारा शिवसेनेच्या रूपाली आल्हाट यांनी दिला आहे. मागील पाच दिवसांपासून रिव्हर सोसायटीसमोर उपोषण सुरु आहे. यासोबतच स्वाक्षरी मोहीम सुरु आहे. घोडेस्वारीसाठी दुसरे मैदान निवडा हे मैदान आम्हाला खेळायला, धावायला ठेवा असे म्हणत चिमुकले स्वाक्षरी करत आहेत. याबाबत बोलताना रूपाली आल्हाट म्हणाल्या, हे क्रीडांगण घोडेस्वारीसाठी नको तर अबालवृद्धांना चालायला, चिमुकल्यांना खेळायला, बागडायला ठेवा. सध्याच्या मुलांना मैदानी खेळ महत्वाचे म्हणतो, मग मैदानच नाही तर खेळ कसले. यासाठी प्रशासनासोबचत पत्रव्यवहार केला होता. त्यांनी हॉर्सरायडींग थांबवण्याची भूमिका न घेतल्याने उपोषण सुरु केले. सोमवारी सकारात्मक बैठक न झाल्यास पुन्हा अमरण उपोषणाचा लढा सुरुच ठेवणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# 'इंद्रायणी रिव्हर सायक्लॉथॉन' टीमचा विश्वविक्रम ; उद्या होणार रॅली!

## गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद, ३० हजार सायकलपटू सहभागी होणार



**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पर्यावरण संवर्धनासाठी काम करणाऱ्या 'इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन' टीमच्या पुढाकारामुळे पिंपरी-चिंचवड शहराच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. या टीमने जर्मनीचा विक्रम मोडीत काढत 'लाँगेस्ट लाईन ऑफ बायसिकल्स स्टॅटिक्स'चा विश्वविक्रम प्रस्थापित केला आहे. त्याची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. त्यामुळे उद्या, रविवारी दि. ३ डिसेंबर रोजी होणाऱ्या ऐतिहासिक रॅलीला सुमारे ३० हजार सायकलपटू सहभागी होतील, असा दावा आयोजकांनी केला आहे.

> “ ‘इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन’ च्या टीमसाठी आजचा दिवस सुवर्णाक्षरांनी कोरला जाईल. गेले दोन महिने आम्ही यासाठी प्रयत्न करीत आहोत. ‘गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड’ मध्ये नोंद झाल्याचे विशेष समाधान आहे. आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून नदी स्वच्छता आणि संवर्धनाचा संदेश देण्यासाठी उद्या. दि. ३ डिसेंबर रोजी सकाळी गावजत्रा मैदान, भोसरी येथून ऐतिहासिक सायकल रॅली निघणार आहे. ५ किमी, १० किमी आणि २५ किमी अशा तीन प्रकारांत रॅली होईल. विजेत्यांना मेडल आणि भेटवस्तू देण्यात येणार आहे. त्यामुळे मोठ्या संख्येने या रॅलीमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन करतो.
>
> **– डॉ. निलेश लोंढे,** रिव्हर सायक्लोथॉन टीम.

इंद्रायणी नदी स्वच्छता आणि संवर्धनासाठी अविरत श्रमदान, सायकल मित्र, महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन, पिंपरी-चिंचवड महापालिका, पिंपरी-चिंचवड पोलीस आणि परिसरातील पर्यावरण प्रेमी संस्था, संघटनांच्या पुढाकाराने प्रतिवर्षी 'इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन' आयोजित केली जाते. त्या पार्श्वभूमीवर शनिवारी 'रिव्हर सायक्लोथॉन' टीमने विश्वविक्रम प्रस्थापित करण्याचा संकल्प केला होता. यावेळी आमदार महेश लांडगे, अविरत श्रमदानचे डॉ. निलेश लोंढे यांच्यासह गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे संबंधित अधिकारी उपस्थित होते. २०१५ मध्ये जर्मनीमध्ये 'लाँगेस्ट लाईन ऑफ बायसिकल्स स्टॅटिक्स'चा विश्वविक्रम प्रस्थापित करण्यात आला होता. त्यानंतर हा विक्रम भारताच्या आणि पर्यायाने पिंपरी- चिंचवडच्या नावावर कोरण्यात आला आहे. भोसरी येथील गावजत्रा मैदानावर हा विक्रम स्थापित करण्यात आला.

# अजित पवारांची भूमिका सुसंगत नव्हती!

## प्रफुल पटेलांनी ईडीच्या कारवाईवर पुस्तक लिहावं

**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
यांनी काही गौप्यस्फोट केलेत त्यातील बऱ्याच गोष्टी मला पहिल्यांदाच कळल्या, असं राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार (डहरऑरव झुरुअॅ) म्हणाले. शरद पवार यांनी पत्रकार परिषद घेऊन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलेले गौप्यस्फोट, राज्यातील पाणी टंचाई आणि अतिवृष्टी याबाबत भाष्य केलं. उपमुख्यमंत्री अजित पवार (अक्षळीं झुरुअॅ) यांनी केलेल्या गौप्यस्फोटानंतर, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार (डहरऑरव झुरुअॅ) यांनी उत्तर दिलं. अजित पवारांनी लोकसभेच्या (डेज्ञ डरलहर एश्रशलींळेप) चार जागा लढवण्याची घोषणा केली. त्यावरही शरद पवारांनी भाष्य केलं. ते पुण्यात बोलत होते. यावेळी राष्ट्रवादीचे नेते एकनाथ खडसे, अनिल देशमुख, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे सुद्धा उपस्थित होते.




पक्षाचा अध्यक्ष मीच होतो, माझी भूमिका स्पष्ट होती, भाजप बरोबर जायचं नव्हतं. भाजपसोबत जाण्याची भूमिका आमची नव्हती. अजित पवारांची भूमिका आमच्याशी सुसंगत नव्हती. मी राजीनामा देण्याचं कारण काय होतं? मी पक्षाचा अध्यक्ष होतो. माझ्या राजीनाम्याचा निर्णय सामूहिक झाला होता. भाजपसोबत जायचं नाही ही आमची भूमिका होती. ज्यांना जायचं होतं ते त्यांच्यासोबत गेले. मी त्यांना कधीच बोलावलं नाही, असं शरद पवार म्हणाले. अजित पवार यांच्या गौप्यस्फोटावर शरद पवार म्हणाले, ''त्यातील बऱ्याच गोष्टी मला पहिल्यांदाच समजल्या. ज्या मागण्या केल्या होत्या त्या संबंधीची चर्चा झाली होती. मात्र तो रस्ता आम्हाला मान्य नव्हता. आम्ही भाजपमध्ये जाण्यासाठी लोकांची मतं मागितली नव्हती. जी आमची भूमिका होती त्याला लोकांचा पाठिंबा होता. त्यांनी निवडलेला रस्ता म्हणजे लोकांची फसवणूक आहे''. पक्षाचा अध्यक्ष मी होतो. सामूहिक निर्णय झाला होता. भाजपबरोबर जायला नको ही स्पष्ट भूमिका होती. मला आनंद परांजपे किंवा जितेंद्र आव्हाडांची मदत घेण्याची गरज नाही. माझी स्वत:ची निर्णय घेण्याची कुवत आहे. लोकांच्या समोर जायचं असेल तर लोक जी भूमिका घेतील ती मान्य करावी लागेल. काहीही स्टेटमेंट केलं त्याचा स्वीकार मी का करायचा? त्यांनी राजकीय निर्णय घेतला तो त्यांचा अधिकार आहे, फक्त त्यांनी राष्ट्रवादीच्या नावावर मत मागितलं. त्याच्याशी विसंगत भूमिका त्यांनी घेतली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गटाचे खासदार प्रफुल पटेल यांनी आपण लवकरच पुस्तक लिहून गौप्यस्फोट करणार असल्याचं म्हटलं होतं. त्यावर शरद पवार म्हणाले, पटेलांच्या पुस्तकाची मी वाट बघतोय. प्रफुल पटेलांकडे पुस्तक लिहिण्यासाठी अनेक मुद्दे आहेत. पटेलांनी लोक पक्ष सोडून का जातात, यावर त्यांनी पुस्तक लिहावं. ईडीच्या कारवाईवरही त्यांनी पुस्तक लिहावं.

### पाहिजे ते मंत्रीपद द्यायला सुद्धा तयार

**» ज्यांनी मला फसवलं (भाजप) त्यांच्यासोबत मला जायचं नव्हतं. आमच्यासोबत चला म्हणून माझ्या घरी हसन मुश्रीफ पाच तास बसून होते. मला पाहिजे ते मंत्रीपद द्यायला सुद्धा तयार होते, असा दावा अनिल देशमुख यांनी केला. राज्याच्या काही जिल्ह्यांमध्ये दौरे झाले. त्यांच्या पाहण्यांमध्ये दोन गोष्टी दिसल्या. दुष्काळी परिस्थिती आहे, पाणी टंचाई आहे. काही भागात अतिवृष्टी झाली आहे. मोठं नुकसान झाले. येत्या अधिवेशनात ही भूमिका मांडली जाईल. त्याआधी मुख्यमंत्री यांनी वेळ दिला तर आम्ही जाऊन भेटणार. सरकारसोबत जा, मी राजीनामा देतो असं शरद पवार म्हणाल्याचा गौप्यस्फोट उपमुख्यमंत्री अजित पवारांनी केला होता.**

# जलप्रदूषणाबाबत प्रशासन गंभीर नाही का?

## आळंदीत अकरा डिसेंबरला ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा

**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
लाखो वारकऱ्यांचं श्रद्धास्थान असलेल्या आळंदीत इंद्रायणी नदी पुन्हा एकदा जलप्रदूषणाच्या विळख्यात अडकली आहे. संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. अशातच पुन्हा एकदा इंद्रायणी नदी फेसाळली आहे. नदीमध्ये रसायनयुक्त पाणी सोडलं गेल्याने हे प्रदूषण होत असल्याचा आरोप आळंदीकरांनी केला आहे. गेल्या काही दिवसांमध्ये इंद्रायणी नदीमध्ये वारंवार रसयानुक्त फेस येत असल्याचं दिसून येत आहेत.




यासंबंधी प्रशासन देखील गंभीर नसल्याचे चित्र अधोरेखित होत आहे. येत्या नऊ डिसेंबरला आळंदीमध्ये कार्तिकी वारी सोहळा होणार आहे. तर अकरा डिसेंबरला ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा पार पडणार आहे. या सोहळ्यासाठी राज्यभरातून लाखो वारकरी आळंदीमध्ये दाखल होतात. या वारकऱ्यांचं श्रद्धास्थान असलेल्या इंद्रायणी नदीच्या प्रदूषणामुळे चिंता व्यक्त केली जात आहे. इंद्रायणी नदीतील प्रदूषणामुळे वारकरी आणि नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. वारकऱ्यांच्या आणि आळंदीकरांच्या आरोग्याशी खेळ- खेळला जातो की काय? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. इंद्रायणी नदीच्या प्रदूषणावर प्रशासन देखील ठोस पावलं उचलत नसल्याचं बघायला मिळत आहे. इंद्रायणी नदी प्रदूषण मुक्त व्हावी यासाठी प्रशासनाने योग्य ते निर्णय घेणे गरजेचे आहेत.त्यांनी यावेळी केले. अशातच पुन्हा एकदा इंद्रायणी नदी फेसाळली आहे. नदीमध्ये रसायनयुक्त पाणी सोडलं गेल्याने हे प्रदूषण होत असल्याचा आरोप आळंदीकरांनी केला आहे. गेल्या काही दिवसांमध्ये इंद्रायणी नदीमध्ये वारंवार रसयानुक्त फेस येत असल्याचं दिसून येत आहेत.

### प्रशासन गंभीर नसल्याचे चित्र

**» लाखो वारकऱ्यांचं श्रद्धास्थान असलेल्या आळंदीत इंद्रायणी नदी पुन्हा एकदा जलप्रदूषणाच्या विळख्यात अडकली आहे. संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. अशातच पुन्हा एकदा इंद्रायणी नदी फेसाळली आहे. नदीमध्ये रसायनयुक्त पाणी सोडलं गेल्याने हे प्रदूषण होत असल्याचा आरोप आळंदीकरांनी केला आहे. गेल्या काही दिवसांमध्ये इंद्रायणी नदीमध्ये वारंवार रसयानुक्त फेस येत असल्याचं दिसून येत आहेत. यासंबंधी प्रशासन देखील गंभीर नसल्याचे चित्र अधोरेखित होत आहे.**

# दहावी, बारावीच्या परीक्षेच्या गुणांबाबत सीबीएसईने घेतला मोठा निर्णय!

## जे ज्याच्या हक्काचे आहे ते त्याच्याकडे राहिले पाहिजे : खा. सुप्रिया सुळे

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाकडून (सीबीएसई) दहावी आणि बारावीच्या परीक्षेत विद्यार्थ्यांने मिळवलेल्या गुणांची टक्केवारी, श्रेणी तयार करून दिली जाणार नाही. तर विद्यार्थी प्रवेश घेणाऱ्या शिक्षण संस्थेला, नोकरी देणाऱ्या नियोक्त्यालाच विषयांनिहाय गुणांच्या आधारे एकूण टक्केवारी तयारी करावी लागणार आहे. सीबीएसईने या संदर्भातील परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे. सीबीएसईच्या दहावी आणि बारावीच्या परीक्षा १५ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहेत. परीक्षांच्या तारखा सीबीएसईकडून मे महिन्यातच जाहीर करण्यात आल्या होत्या. विद्यार्थ्यांमधील स्पर्धा थांबवण्यासाठी करोना काळात सीबीएसईने गुणवंत विद्यार्थ्यांची यादी जाहीर करण्याची पद्धत बंद केली. त्यानंतर आता गुणांची टक्केवारी, श्रेणी न देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सीबीएसईचे परीक्षा नियंत्रक संयम भारद्वाज यांनी परिपत्रकात नमूद केल्यानुसार, विद्यार्थ्यांचे गुण मोजण्याचे निकष जाहीर करण्याबाबतची मागणी करण्यात येत आहे. मात्र, गुणांची टक्केवारी, श्रेणी दिली जाणार नाही अशी तरतूद सीबीएसईच्या नियमावलीतील उपविधीमध्ये आहे. विद्यार्थ्याला पाचपेक्षा जास्त विषय देण्यात आले असल्यास त्यातील सर्वोत्तम पाच विषय निवडण्याचा निर्णय संबंधित शिक्षण संस्था किंवा नियोक्ता घेऊ शकतात. सीबीएसईकडून गुणांची मोजणी, टक्केवारी, श्रेणी जाहीर केली जाणार नाही. उच्च शिक्षण आणि नोकरीसाठी गुणांची टक्केवारी आवश्यक असल्यास त्याबाबतची कार्यवाही प्रवेश देणारी शिक्षण संस्था किंवा नियोक्ता करू शकतात. सीबीएसईने दहावी आणि बारावीची परीक्षा १५ फेब्रुवारीपासून सुरू होणार असल्याचे जाहीर केले असले, तरी सविस्तर वेळापत्रक अद्याप जाहीर करण्यात आलेले नाही. गेल्यावर्षी दहावीच्या २१ लाखांहून अधिक, बारावीच्या १६ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती.



### श्रेणी जाहीर केली जाणार नाही

» मात्र, गुणांची टक्केवारी, श्रेणी दिली जाणार नाही अशी तरतूद सीबीएसईच्या नियमावलीतील उपविधीमध्ये आहे. विद्यार्थ्याला पाचपेक्षा जास्त विषय देण्यात आले असल्यास त्यातील सर्वोत्तम पाच विषय निवडण्याचा निर्णय संबंधित शिक्षण संस्था किंवा नियोक्ता घेऊ शकतात. सीबीएसईकडून गुणांची मोजणी, टक्केवारी, श्रेणी जाहीर केली जाणार नाही. उच्च शिक्षण आणि नोकरीसाठी गुणांची टक्केवारी आवश्यक असल्यास त्याबाबतची कार्यवाही प्रवेश देणारी शिक्षण संस्था किंवा नियोक्ता करू शकतात.

# वाहतुकीचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाईचा दंडुका!

## अवघ्या महिन्यात पावणे तीन कोटी दंड वसूल

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेने कारवाईचा दंडुका उगारला आहे. एक ते ३० नोव्हेंबर या अवघ्या महिन्या भराच्या कालावधीत ३२ हजार ७७५ बेशिस्त वाहन चालकांवर कारवाई करत दोन कोटी ७२ लाख रुपयांचा दंड वसूल केला आहे. पिंपरी-चिंचवड शहराचा विकास आणि वाढ वेगाने होत आहे. त्यामुळे लोकसंख्येबरोबरच वाहनांची संख्या वाढत आहे. वाढलेल्या वाहनांच्या संख्येमुळे वाहतुकीशी निगडीत होणाऱ्या अपराधांची संख्या देखील वाढू लागली आहे. वाहतुकीला शिस्त लागण्यासाठी तसेच अपघात रोखण्यासाठी पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेने कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर वाहतूक पोलिसांकडून दंडात्मक कारवाई केली जात आहे. नोव्हेंबर महिन्यात वाहतूक पोलिसांनी मोठ्या प्रमाणात कारवाई करत दोन कोटी ७२ लाख ९१ हजार ७०० रुपयांचा दंड वसूल आहे. तसेच विरुद्ध दिशेने वाहन चालवणाऱ्या ६०७ वाहन चालकांवर थेट खटले दाखल केले आहेत. तसेच जड अवजड वाहनांना प्रवेश बंदी केलेल्या मार्गावर प्रवेश करणाऱ्या सहा हजार ३७२ जड अवजड वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. महिन्याभरात ३२ हजार ७७५ वाहन चालकांवर कारवाई केली आहे.



वाहन चालविताना मोबाईल फोनवर बोलणाऱ्या ९३९, वाहतूक नियंत्रक दिवा (सिग्नल) तोडणाऱ्या एक हजार ७२८, दुचाकीवरून तिघे जण प्रवास करणाऱ्या तीन हजार ५५९, विना हेल्मेट दोन हजार ८८०, सुरक्षा बेल्ट परिधान न करणाऱ्या दोन हजार २२०, काळी काच असलेल्या एक हजार ३९० वाहनांवर, सायलेन्सर जोरात वाजविणाऱ्या ८८४, वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या आठ हजार ९६७ आणि बीआरटी मधून वाहन चालविणाऱ्या तीन हजार २२९ वाहन चालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आले आहे.वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेने कारवाईचा दंडुका उगारला आहे. एक ते ३० नोव्हेंबर या अवघ्या महिन्या भराच्या कालावधीत ३२ हजार ७७५ बेशिस्त वाहन चालकांवर कारवाई करत दोन कोटी ७२ लाख रुपयांचा दंड वसूल केला आहे.